# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

प्रेसनोट

**2022**

दिनांक १९.१२.२०२२

गुन्हे शाखा, नवी मुंबई

**झायलो कार मधुन गुजरात वरुन नवी मुंबई परिसरात विक्री करण्यासाठी आणलेला प्रतिबंधीत गुटखा रबाले पोलीस ठाण्याच्या हद्दीत ऐरोलीयेथे गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने पकडुन केली कारवाई**

**(आरोग्यास घातक असलेल्या गुटख्याची वाहतुक करणाऱ्याच्या आवळल्या मुसक्या)**

.................................................................................................

मा.श्री.मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, मा.डॉ.श्री.जय जाधव सह पोलीस आयुक्त, मा. श्री.महेश घुर्ये अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमित काळे पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) यांनी नवी मुंबई गुटखामुक्त करण्याचे व त्याचा व्यापार करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दि. १६/१२/२०२२ रोजी नवी मुंबई पोलीसांच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षास गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली कि, रबाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीत रोहाऊस नं. १४ समोर रस्त्यावर, झुलेलाल कोहौसो, सेक्टर २, ऐरोली, नवी मुंबई येथे वापी, गुजरात येथुन झायलो कार नंबर एमएच ०३ एझेड ४८२१ मधुन प्रतिबंधीत गुटखा आणुन टेम्पो नंबर एमएच ०४ केएफ ३९७६ मध्ये खाली करणार आहे. त्या अनुशंगाने मा.श्री.विनायक वस्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि बासीतअली सय्यद, पोउपनि विजय शिंगे, एएसआय सलीम इनामदार, पोहवा/५७८ संतोष गायवाकड, पोहवा/१२०२ कासम पिरजादे, पोहवा/१३७७ रमेश तायडे, पोना/२८७९ महेंद्र अहिरे यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी रोहाऊस नं. १४ समोर रस्त्यावर, झुलेलाल कोहौसो, सेक्टर २, ऐरोली, नवी मुंबई येथे सकाळी ०५.४० वा. छापा टाकला असता झायलो कार नंबर एमएच ०३ एझेड ४८२१ मधुन प्रतिबंधीत गुटख्याच्या गोणी टेम्पो नंबर एमएच ०४ केएफ ३९७६ मध्ये भरत असताना झायलो कारचा चालक उमेश शंभु भारती, वय ३२ वर्षे, रा. वागळे इस्टेट, ठाणे व टेम्पोचा चालक/मालक अमरजित रामप्रवेश सिंग, वय ५५ वर्षे, रा. ऐरोली नवी मुंबई यांचेसह झायलो कारच्या पुढे राहुन गुजरात येथुन एस्कॉर्ट करत येणारा सदर गुटखा गुजरात मधुन वाहतुक करुन आणणारा जय प्रदीप भानुशाली, वय ३४ वर्षे, रा. घाटकोपर, मंबई यास त्याच्या होन्डा सिटी कार क्र. एमएच ०२ सीव्ही ७५५४ सह पकडले.

त्यांचेकडुन एकुण रु.४,३७,१८४/— किमतीचा गुटखा व सुगंधीत तंबाखु तसेच एकुण रु. ११,५०,०००/— किमतीची वाहने व रु.२५,०००/— किमतीचे मोबाईल फोन असा एकुण रु.१६,१२,१८४/— किमतीचा माल जप्त केला आहे.

सदर आरोपी विरुध्द रबाले पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ६०५/२०२२ भारतीय दंड सहिंता १८६० कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ सह अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम २६, २७, ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पो.उप निरी. विजय शिंगे हे करित आहेत.

——————————————